(१)

जा.क्र. पोआ/ 3099 /२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
यांचे कार्यालय,
दिनांक :- 3 .०५.२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक ०४.०५.२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक १७.०५.२०२० चे २४.०० वा.चे दरम्यान संचारास मनाई तसेच जमावबंदी व वाहतूक मनाई आदेश. (पिंपरी चिंचवड महापालिका हद्द व देहुरोड छावणी परिषद हद्द - कंन्टेन्मेन्ट झोन्स आणि रेड झोनसाठी) (आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पुणे जिल्हा रेड झोन मध्ये समाविष्ट आहे.)**

सुधारीत **आदेश -**

२) ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात महाराष्ट्रात ,पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे. असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. तसेच केंद्र सरकार आदेश नं.४०-३/२०२०-डीएम-१(ए) भारत सरकार, गृह मंत्रालय दि. ०१/०५/२०२० अन्वये लॉकडाऊन आदेशाची मुदत १७/०५/२०२० अखेर वाढवली आहे.. तसेच महाराष्ट्र शासनाने संदर्भ नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक ०२/०५/२०२० अन्वये आदेश जारी करुन लॉकडाऊन आदेशाची मुदत दिनांक १७/०५/२०२० अखेर वाढविली आहे.

३) ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरात कोरोना बाधित रूग्णांची संख्या चिंताजनकरित्या वाढत आहे. आणि शहराच्या काही भागात कोव्हीड - १९ चे क्लस्टर निर्माण झाले असून त्या परिसरात मोठया प्रमाणात रुग्ण संख्येत वाढ झालेली दिसत आहे. त्यामुळे कोव्हीड -१९ चा सामुदायिक प्रसार (**Community Transmission**) सुरु होण्याची शक्यता असल्याने आणि कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जिवीताला धोका निर्माण होण्याचा संभव निर्माण झाल्याने **आयुक्त पिंपरी चिंचवड महानगर पालिका यांनी त्यांचे** कार्यालयाकडील **आदेश क्र.वैदय/०९/कावि/२०४२/२०२० दिनांक २७/०४/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड** महानगरपालिका **क्षेत्रातील १६ परिसर दि.२७/०४/२०२० रोजीचे रात्री १२.०० वाजले पासून पुढील आदेशापर्यंत कन्टेन्मेन्ट झोन** म्हणून घोषित केले होते.

४) ज्याअर्थी संदर्भ केंद्रीय गृह मंत्रालय आदेश नं. ४०-३/२०२०-डीएम-१(ए)दि. ०१/०५/२०२० व महाराष्ट्र शासन संदर्भ क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक ०२/०५/२०२० अन्वये राज्यात कोव्हीड-१९ चे कन्टेन्मेन्टसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना पारित केल्या आहेत. सदर महाराष्ट्र शासनाचे सुधारीत आदेशानुसार रेडझोन/कन्टेन्मेन्ट झोन हे आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे सर्व घटक आणि प्रशासनाचे नियंत्रण व मदत पोहचविण्याची क्षमता इत्यादी बाबी विचारात घेऊन निश्चित करण्याचे निर्देश आहेत.

५) **ज्याअर्थी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगर पालिका यांनी त्यांचे** कार्यालयाकडील **आदेश क्र. वैदय/०९/कावि/२१७७/२०२० दिनांक ०३/०५/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड** महानगरपालिका **हद्दीतील खालील नमुद क्षेत्रातील परिसरास दिनांक ०३/०५/२०२० रोजीचे रात्री २४/०० वा. पासुन ते पुढील आदेशापर्यंत कन्टेन्मेट झोन घोषीत केला आहे.**

**आणि ज्याअर्थी उपविभागीय दंडाधिकारी,मावळ,मुळशी विभाग पुणे यांनी त्यांचे** कार्यालयाकडील **आदेशान्वये देहुरोड छावणी परिषद पुर्ण परिसर कन्टेन्मेन्ट झोन घोषित केला आहे.**

**कन्टेन्मेन्ट झोन्स - प्रतिबंधीत क्षेत्र**

| अ.क्र | कंटेंनमेन्ट झोन | पोलीस स्टेशन | समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | खराळवाडी परीसर, पिंपरी | पिंपरी | जामा मस्जिद, खराळवाडी या भोवतीचा परीसर, पिंपरी(गिरमे हॉस्पीटल- अग्रसेन लायब्ररी, क्रिधा ट्रेडर्स, चैताली पार्क हौसिंग सोसायटी, खराळ आई गार्डन, ओम हॉस्पीटल, ओरीयल बँक, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सिटी प्राईड हॉटेल, क्रिस्टल कोर्ट हॉटेल, गिरमे हॉस्पीटल) |
| २ | पी एम टी चौक परीसर, भोसरी | भोसरी | पाटील हॉस्पीटल पिएमटी चौक, मारुती मंदिर, पीसीएमसी पाणी टाकी, भोसरी जुने हॉस्पीटल, विश्वविलास बिर्याणी हाऊस |
| ३ | गुरुदत्त कॉलनी परीसर भोसरी | भोसरी | भोसरी आळंदी रोड बिकानेर स्वीट्स, एच पी पेट्रोलपंप बालाजी मंदिर, दुर्वाकुंर लॉन्स मागील बाजु, न्यु मिलान बेकरी, हरीओम स्वीट्स, महा-ई सेवाकेंद्र, ममता स्वीट्स, आनंद हॉस्पीटल |
| ४ | रामराज्य प्लॅनेट परीसर कासारवाडी, भोसरी | भोसरी | सि एम ई हद्द, ७ ॲप्पल हॉटेल, सिध्दार्थ मोटर्स, मुबंई पुणें हायवे, दत्तमंदिर, पोस्ट ऑफिस |
| ५ | गणेशनगर परीसर, दापोडी | भोसरी | पाण्याची टाकी, रेल्वे लाईन, सिध्दी टॉवर्स, माता शितळादेवी चौक, श्रेया एंटप्रायजेस, न्यु मिलेनियम स्कुल इंग्लिश स्कुल, |
| ६ | शास्त्री चौक, परीसर भोसरी | भोसरी | संत ज्ञानेश्वर प्राथमिक शाळा, परफेक्ट इलेक्ट्रीकल, व्यंकटेश मेडिकल, महानगर को - ऑप बॅक, भोसरी आळंदी रोड |
| ७ | तनिष्क ऑकिंड परीसर, च-होली | आळंदी | तनिष्क ऑकिंड परीसर, च-होली हद्द |
| ८ | कृष्णराज कॉलनी परीसर, पिंपळे गुरव | सांगवी | पवना नदी किनारा, दत्त मंदिर,बालाजी हॉटेल भारत गॅस एजन्सी, पवना नदी किनारा |
| ९ | नेहरुनगर बस डेपो परीसर, नेहरुनगर पिंपरी | पिंपरी | जनता सहकारी बॅक, नुरानी मस्जिद, पवार पेट्रोलपंप, हैद्राबाद बिर्याणी हॉऊस |
| १० | कावेरी पोलीस लाईन परीसर, वाकड | वाकड | बी एस एन एल टेलिफोन एक्सचेंन्ज, Seseme शाळा रस्ता, Infant Jesus High School , अण्णाभाऊ साठे नगर |
| ११ | रुपीनगर, परीसर तळवडे | चिखली | दिपक ग्लास सेंन्टर, स्वामी समर्थ मठ, त्रिवेणी चौक, भक्ती शक्ती बस डेपो |
| १२ | गंधर्वनगरी परीसर मोशी, भोसरी एमआयडीसी | भोसरी एमआयडी सी | जय हनुमान ट्रेडर्स, हॉटेल सुर्योद्य हॉटेल, PAMU हायड्रोलिक्स, मोशी कचरा डेपो, पुणे नाशिक हायवे |
| १३ | विजयनगर परीसर दिघी | दिघी | शिवशंकर अर्पा, समायक गॅस एजन्सी, गणेश सुपर मार्केट, राघव मंगल कार्यालय, संत ज्ञानेश्वर रोड, व्ही आर एल कुरिअर सर्विसेस |
| १४ | तनिष्क आयकॉन, परीसर दिघी | दिघी | पाण्याची टाकी, कृष्ण आंगण कॉमप्लेक्स, ओम साई मिसळ, आळंदी रोड, सुदामा भेळ |
| १५ | मधुबन सोसायटी, परीसर, जुनी सांगवी | सांगवी | मुळा नदी, सी क्यु ए ई परीसर, कामटे फुड्स, गणेश मंदिर, कैलास स्वीट्स इंडियन ऑईल पेट्रोलपंप |
| १६ | तपोवन रोड परीसर पिंपरी वाघेरे | पिंपरी | सुखवानी सिटी, व्होडाफोन स्टोअर नंद किराना स्टोअर, ज्ञानेश्वर जनरल चौक, कापसे चौक, वाडेकर मिसळ |
| १७ | १६ नंबर बसस्टॉप, परीसर, थेरगाव | वाकड | औंध रावेत बिआरटीएस रोड, प्रोबस सॉफ्टवेअर प्रा.लि अक्षय पार्क सोसायटी, इंडियन बॅक, प्रेम कुल्फी सेंटर |
| १८ | शिवाजी चौक, परीसर, पिंपळे निलख | सांगवी | एस एस फर्निचर, गुरुदत्त मेडिकल, बाबुराव कामटे चौक, पाण्याची टाकी, जय मल्हार मेस, बाबासाहेब आंबेडकर पथ, कांबळे प्रॉपर्टिज |
| १९ | इंदिरानगर परीसर, चिंचवड | चिखली | बीएसएनएल स्टाफ क्वॉर्टर भिंत, महिंद्रा टु - व्हिलर, चिखली कस्पट वस्ती, बीआरटीएस रोड, सरस्वती को-ऑप बॅक, डबल ट्री हिलटन, कॉपोरेशन बॅक, ASMS कॉलेज, तेजस एंन्टरप्रायजेस , पिंपरी चिंचवड सायन्स पार्क मागील बाजुस |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | शुभश्रि रो हाऊस सोसायटी, पिंपळे गुरव | सांगवी | कुणाल आयकॉन रोड, एमएसईबी ऑफिस, ओम दत्तराज मंदिर, रोजवुड सोसायटी, सोमनाथ स्नॅक्स सेंन्टर ओम चैतन्य डेअरी, पकवान स्वीट्स |
| २१ | साठ फुटी रोड परीसर, पिंपळे गुरव | सांगवी | तुळजा भवानी मंदिर, भालचंद्र हॉस्पीटल, निलम सुपर मार्केट, गणेश मंदिर, माऊली हॉटेल, श्रीगणेश डेअरी, जयश्री स्वीट्स |

**देहुरोड छावणी परिषद**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | देहुरोड छावणी परिषद | देहुरोड | संपुर्ण देहुरोड छावणी परिषद क्षेत्र |

६) ज्याअर्थी या पार्श्वभूमीवर सारासार विचार करुन तातडीची प्रतिबंधक उपाययोजना करणेसाठी फौजदारी दंड प्रक्रीया संहीता कलम १४४ मधील तरतुदीच्या अंतर्गत क्षेत्र प्रतिबंधक करणे, क्षेत्रातील नागरींकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे, क्षेत्रातून वाहनांचे अवागमन प्रतिबंधीत करणेसाठी स्थानिक निवासी अभ्यागत वारंवार कामानिमित्त **पिंपरी चिंचवड शहरात** आणि देहुरोड **छावणी परिषद क्षेत्रात** प्रवेश करणारे यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झाली असल्याने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील **पिंपरी चिंचवड** महानगरपालिका **क्षेत्रासाठी तसेच** देहुरोड **छावणी परिषद क्षेत्रासाठी आदेश** काढणे अत्यावश्यक असलेबाबत माझी खात्री झाली आहे.

७) त्याअर्थी **मी संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१.०४.१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्राच्या **कन्टेन्मेन्ट झोन** मध्ये नमुद केलेल्या भागातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी संचार करणे, वाहतुक करणे, फिरणे, उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे, सर्व कृत्यास तरतुदींच्या अधिन राहुन सुधारीत सचारास मनाई व वाहतुक मनाई तसेच **रेड झोन** मध्ये नमुद केलेल्या कार्यक्षेत्रात जमावबंदी व वाहतुक मनाई करणारा आदेश **दिनांक ०४.०५.२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक १७.०५.२०२० चे २४.०० वा** चे दरम्यान लागू करीत आहे.

८) **उपरोक्त वर नमुद कन्टेन्मेन्ट झोन्समध्ये तसेच कन्टेन्मेन्ट झोन मध्ये येत असलेल्या पोलीस ठाणे अंतर्गत परिसरामध्ये संचारबंदी लागू राहील. आणि नागरिकांना व वाहनांना सदर कन्टेन्मेन्ट झोनमध्ये प्रवेशबंदी तसेच परिसरातुन बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे.**

अ)सर्व सार्वजनिक वाहतुकीची वाहने त्यामध्ये पीएमपीएमएल बसेस सह इतर सार्वजनिक वाहनांना तसेच प्रवासी वाहतुक पुरविणा-या सर्व शहराअंतर्गत आणि आंतरराज्य व राज्याअंतर्गत बसेस तसेच प्रवासी वाहतुक सेवा पुरविणा-या सर्व खाजगी वाहनांना कन्टेन्मेन्ट झोन मध्ये प्रवेश करण्यास मनाई राहील.तसेच कोणत्याही व्यक्तीला वर नमुद कार्यक्षेत्राताील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतूकीचे रस्त्यावर,गल्लोगल्ली याठिकाणी सायकल तसेच पारंपारिक व अपारंपारिक इंधनावर चालणा-या मोटार सायकल,स्कुटर (गिअर सह/ शिवाय) सर्व प्रकारची वाहतुक करणारी तीनचाकी वाहने, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, जड व अवजड वाहने वाहतुकीची वाहने यांची वाहतुक व त्यामधुन प्रवास करण्यास मनाई आहे.

ब)कंटेन्मेट झोनमधील खाजगी बाहय रुग्ण विभाग (OPD) वैदयकीय चिकित्सालय (मेडीकल क्लिनिक )बंद राहतील.

क) सक्त परिमीती नियंत्रण (Strict Perimeter Control) करण्यात येईल.

ड) आत जाण्याचे व बाहेर पडण्याचे मार्गाची स्पष्ट निश्चिती राहील.

इ) कंन्टेन्मेंट झोन मध्ये कोणत्याही व्यक्तीस व वाहनास तपासणी केल्याशिवाय प्रवेशास मनाई आहे.

ई) कंन्टेन्मेंट झोन मध्ये येणा-या जाणा-या नागरीकांच्या सविस्तर नोंदी घेतल्या जातील.

उ) फक्त जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणा-या व अत्यावश्यक सेवा तसेच वैदयकीय सेवा पुरविणा-या व्यक्तींना झोनमध्ये येण्याजाण्याची परवानगी राहील.

ऊ) आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांची सक्त अंमलबजावणी केली जाईल.

फ) राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयाकडील **आदेश जाक्र.एफएलआर १०२०/कोविड-१९/७ मुंबई दिनांक ०३/०५/२०२० अन्वये मदय विक्रींच्या** अनुज्ञप्तीबाबत **रेड झोनमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आदेशान्वये कन्टेन्मेन्ट झोनमध्ये मदय विक्रीस बंदी आहे.**

उपरोक्त मनाई आदेश पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील दिनांक ०३/०५/२०२० चे आदेशान्वये २१ कंन्टेन्मेन्ट झोन मध्ये तसेच उपविभागीय दंडाधिकारी मावळ यांचे आदेशान्वये देहुरोड छावणी परिषद कन्टेन्मेन्ट झोनसाठी लागू राहील व सदरचा मनाई आदेश **पिंपरी चिंचवड पोलीस** आयुक्तालयाचा **कार्यक्षेत्रातील खालील** नमुद **पोलीस ठाणे** हददीअंतर्गत लागु राहील. **१) सांगवी पोलीस स्टेशन, २) वाकड पोलीस स्टेशन ३)चिखली पोलीस** स्टेशन **४) पिंपरी पोलीस स्टेशन ५) निगडी पोलीस स्टेशन ६) भोसरी पोलीस स्टेशन ७)भोसरी** एमआयडीसी **पोलीस स्टेशन ८) दिघी पोलीस स्टेशन ९)** देहुरोड **पोलीस स्टेशन.**

**९) सदरच्या संचारास मनाई (कन्टेन्मेन्ट प्रतिबंधीत क्षेत्र)आदेशातून खालील प्रमाणे सवलतीचे निकष राहतील.**

१. कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे पिंपरी चिंचवड महापालिकेचे, पोलीस विभागाचे व राज्य व केंद्रीय विभागांचे विनिर्दिष्ट कर्मचारी व वाहने तसेच अत्यावश्यक सेवा देणा-या कर्मचारी व वाहनांना सदरच्या आदेशानुसार वगळण्यात येत आहेत. तसेच अत्यावश्यक सेवा व वस्तु यांचा पुरवठा करणारी घाऊक वाहतुक सदरच्या आदेशातुन वगळण्यात येत आहेत.

२. प्रतिबंधित क्षेत्रात (कंटेनमेंट झोन) मनपा व्दारे चालविण्यात येणारी अथवा परवानगी दिलेली फिव्हर क्लिनिक वगळता अन्य बाहय रुग्ण विभाग व खाजगी वैद्यकिय दवाखाने सुरु ठेवण्यास प्रतिबंधित करण्यात येत आहे

३. उपरोक्त नमुद प्रतिबंधित क्षेत्रातील नागरिकांच्या बँकींग सुविधांसाठी सर्व बँकांनी शाखा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०/०० ते ०२/०० या वेळेत सुरु ठेवाव्यात तसेच आपली एटीएम केंद्रे पुर्ण वेळ कार्यान्वित ठेवावीत.

४. प्रतिबंधित क्षेत्रात सदर काळात सकाळी १०/०० ते दुपारी १२/०० या कालावधीतच दुध ,भाजीपाला फळे यांची किरकोळ विक्री सुरु राहील.

५. प्रतिबंधित क्षेत्रात सदर काळात मटण व चिकन यांची किरकोळ विक्री ही या पुर्वी मनपाने दिलेल्या आदेश क्र. भुजि/०२/कावि/२२०/२०२० दि.१६/०४/२०२० नुसार सकाळी १०/०० ते दुपारी १२/०० या कालावधीतच सुरु राहील.

६. कंन्टेन्मेन्ट क्षेत्रात सदर काळात अत्यावश्यक इतर सामान जसे अन्न धान्य , जिवनावश्यक वस्तु यांची किरकोळ विक्री सुध्दा सकाळी १०/०० ते दुपारी १२/०० वा. या कालावधीतच सुरु राहील.

७. नागरीकांना प्रतिबंधीत क्षेत्रात दैनंदीन जिवनावश्यक वस्तु व सेवा उपरोक्त वर नमुद संदर्भीय आदेशाप्रमाणे सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वा.दरम्यान सुरु ठेवण्यास प्रशासनाकडून परवानगी देण्यात येईल. तशी सविस्तर उद्घोषणा पीए सीस्टींमवरुन करण्यात येईल. दरम्यान मुदतीत सीआरपीसी कलम १४४(१)(३) प्रमाणे जमावबंदी आदेश अंमलात राहतील.सदरवेळी सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास थांबण्यास, चर्चा करणेस मनाई राहील.

८. कन्टेन्मेंट झोनमधील कर्मचा-यांच्या संचारावर नियंत्रण आणण्यासाठी कर्तव्यावरील हजर अधिकारी व कर्मचारी हे शक्यतो त्याच क्षेत्रात वास्तव्यास असावे. तसेच अशा व्यक्तींची त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी वास्तव्याची सूविधा संबंधित आस्थापनांनी उपलब्ध करुन दयावी.

**१०) मनाई कालावधीमध्ये खालील बाबींना सर्व झोनसाठी प्रतिबंध राहील.**

अ)सर्व देशांतर्गत व आंतरदेशीय हवाई वाहतुक, (अपवाद - वैदयकीय सेवांची वाहतुक,हवाई रुग्नवाहीका व सुरक्षेच्या उद्देशाने केलेली वाहतुक तसेच गृहमंत्रालयाने सवलत दिलेल्या बाबींसाठी)

**ब)**सर्व पॅसेंजर रेल्वे गाडया (अपवाद -सुरक्षेच्या उद्देशाने तसेच केंद्रीय गृहमंत्रालयाने सवलत दिलेल्या बाबींसाठी धावणा-या गाडया)

**क)**आंतरराज्यीय सार्वजनिक बस सेवा गृहमंत्रालयाने सवलत दिलेल्या बाबींसाठी वगळुन

ड)आंतरजिल्हा व आंतरराज्य प्रवासी वाहतुक (वैदयकीय कारणांसंबंधीत वाहतुक वगळुन)

इ)सर्व प्रकारचे शैक्षणिक, प्रशिक्षण,शैक्षणिक संस्था शाळा, महाविदयालये बंद राहतील. परंतु ऑनलाईन व दुरशिक्षण यांना परवानगी राहील.

फ)आदरातिथ्य सेवा (Hospitality Services),अपवाद गृहनिर्माण आरोग्य/पोलीस/सरकारी कार्यालये/आरोग्य सेवक, अडकलेल्या प्रवासी व कॉरन्टाईन सेवेतील व्यक्ती

ग)सर्व सिनेमागृहे,मॉल्स,शॉपींग कॉप्लेक्स,व्यायामशाळा/जिम्नॅशियम,क्रीडांगणे/स्पोर्टस् कॉम्लेक्स, जलतरण तलाव,करमणुक उदयाने,चित्रपटगृहे, बार आणि सभागृहे, असेंब्ली हॉल आणि तत्सम ठिकाणे **ह**)सर्व प्रकारचे सामाजिक/राजकीय/ क्रिडा/मनोरंजन/ शैक्षणिक/ सांस्कृतिक/ धार्मिक कार्यक्रम व इतर मेळावे

घ)सर्व धार्मिक स्थळे/ प्रार्थना स्थळे नागरीकांसाठी बंद ठेवली जातील. धार्मिक कार्यक्रम/मेळावे/प्रवचने इत्यादीस सक्त मनाई आहे.

**११) रेड झोन करीता जमावबंदी व वाहतुक मनाई आदेश -(पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्द - घोषित कन्टेन्मेन्ट झोन व्यतीरिक्त उर्वरीत क्षेत्र )**

अ)**नागरीकांना अत्यावश्यक नसलेल्या बाबींसाठी सायंकाळी ०७:०० वा. ते सकाळी ०७:०० वाजेपर्यंत घराबाहेरपडण्यास सक्त मनाई आहे. (पिंपरी चिंचवड शहराच्या बाहेरील भागातील महाराष्ट्र शासनाचे आदेशात सवलत दिलेले व चालू असलेले उद्योग आणि आस्थापना येथे काम करणारे अधिकारी, कर्मचारी, कामगार यांना सुट राहील. परंतु ते त्यांचेसोबत** आस्थापनेकडील **तसेच स्थानिक पोलीस स्टेशनकडील अधिकृत पास सोबत बाळगतील.)**

ब)परिच्छेद क्रमांक १० मधील प्रतिबंधित बाबींव्यतीरिक्त खालील बाबींना परवानगी नाही.

१) ऑटोरिक्षा व सायकल रिक्षा

२) टॅक्सी व कॅब सेवा

३ ) जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बस सेवा

४) न्हाव्याची दुकाने, सलुन व स्पा सेंटर

क)६५ वर्षे वयोगटातील वृद्ध, विकलांग, गरोदर महिला व १० वर्षे वयाखालील मुले यांनी जिवनावश्यक व वैदयकीय गरजेव्यतिरीक्त घराबाहेर पडु नये.

ड )पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील रेड झोन मधील खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारचे कार्यक्रम, समारंभ, सामाजिक कार्यक्रम,धार्मिक कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, सण, उत्सव, उरुस, जत्रा, मनोरंजनाचे कार्यक्रम,क्रिडा व इतर सर्व स्पर्धा इ.यांना मनाई राहील. (उदा. ऑर्केस्ट्रा, तमाशा, संगीत रजनी)

इ)पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारचे मॉल, व्यापारी संकुले, मार्केट हे लॉकडाऊन कालावधीत बंद राहतील. तथापि सदर बाजारपेठा व्यापारी संकुलातील अत्यावश्यक वस्तु पुरवठा करणारी दुकाने सकाळी १०/०० ते दुपारी ०४/०० या वेळेत सुरु राहतील. एकाकी दुकाने नागरी वसाहतीतील दुकाने नागरी संकुलातील दुकाने, प्रतिबंधित क्षेत्र (कन्टेन्मेन्ट झोन ) वगळता उर्वरित भागात सकाळी १०/०० ते दुपारी ०४/०० या वेळेत सुरु राहतील. तथापि एका रस्त्यावरील किंवा गल्लीतील अत्यावश्यक वस्तु पुरवठा करणा-या दुकानाव्यतीरिक्त इतर दुकानांची संख्या पाच पेक्षा अधिक असल्यास अशा रस्ता किंवा गल्लीमध्ये अत्यावश्यक वस्तु पुरवठा करणा-या दुकांनाव्यतीरिक्तची इतर जास्तीत जास्त पाच दुकाने सुरु ठेवण्यासाठी आवश्यक परवानगी देण्यात येईल. सदर परवानगी महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालयाकडुन देण्यात येईल.

ई)सेवाआस्थापना,उपहारगृहे,खादयगृहे,खानावळ,शॉपींग कॉप्लेक्स,मॉल्स,सुपर मार्केट, मनोरंजनाचीठिकाणे, क्लब/पब/क्रीडांगणे,मैदाने,लाईव्ह ऑर्केस्ट्रा,जलतरणतलाव,उदयाने,सिनेमागृहे,नाटयगृहे,प्रेक्षागृह,म्युझीयम, व्हिडीओ पार्लर, ऑनलाईन लॉटरी, मंगल कार्यालये, शाळा,महाविदयालये, प्रशिक्षण व संशोधन, खाजगी शिकवणी वर्ग,(महाराष्ट्र शासन,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई, दिनांक २०.०३.२०२० अन्वये) व्यायामशाळा, संग्रहालय, पान ठेले बंद राहतील.

उ)**राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे** कार्यालयाकडील **आदेश जाक्र.एफएलआर १०२०/कोविड-१९/७ मुंबई दिनांक ०३/०५/२०२० अन्वये मदय विक्रींच्या अनुज्ञप्तीबाबत रेड झोनमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आदेशान्वये मदय विक्री अनुज्ञप्तीबाबत कार्यवाही होईल.**

ऊ)संस्थात्मक अलगीकरण आणि विलगीकरण, (Quarantine)मध्ये देखरेखीखाली ठेवणेत आलेल्या तसेच गृह विलगीकरण (Home Quarantine) मध्ये ठेवण्यात आलेल्या नागरीकास ठरवुन दिलेल्या कालावधीदरम्यान किंवा कालावधी पुर्ण होण्यापुर्वी त्या ठिकाणाहून इतरत्र फिरण्यास मनाई राहील.

ग)सर्व धर्मियांची धार्मीक स्थळे भावीकांसाठी बंद राहतील.कोणत्याही धार्मिक कार्यक्रमांना परवानगी दिली जाणार नाही.

घ)सोसायटीच्या सदस्यांना एकत्रितरित्या जमा होण्यास तसेच सोसायटीमध्ये कोणतेही कार्यक्रम घेण्यास मनाई आहे. तसेच गृह विलगीकरण केलेली व्यक्ती सोसायटीमध्ये वास्तव्यास असल्यास ती स्वतःच्या घरातच राहील याची खात्री करावी. तसेच त्याची जबाबदारी त्या व्यक्तीवर व सोसायटी चेअरमनवर राहील.

भ)सर्व नागरिकांना अनावश्यक रित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय येण्यास मनाई राहील.

म)रेडझोन मधील विशेष आर्थिक क्षेत्रातील मॅन्युफॅक्चरिंग युनिट(SEZ),निर्यात देणारे युनिट (EOU) औदयोगिक वसाहती उदयोग नगरे बंद राहतील.**तसेच जिवनावश्यक उत्पादने व अत्यावश्यक उत्पादने निर्माण करणा-या उदयोगाव्यतिरिक्त इतर सर्व उदयोग व आस्थापना बंद राहतील.**

प)सर्व **खाजगी कार्यालये व आस्थापना (IT/ITES )** सह **बंद राहतील.**

**१२) सदरचे जमावबंदी आदेश खालील बाबतीत लागु होणार नाहीत.**

अ)व्यक्तींना व खाजगी वाहनांना केवळ सवलत दिलेल्या बाबींसाठी परवानगी आहे, चार चाकी खाजगी वाहनात १ चालकासह फक्त २ प्रवासी पाठीमागील सीटवर तसेच दुचाकीवर फक्त १ चालकास परवानगी राहील.

ब)जिवनावश्यक वस्तु, औषधे, फार्मास्युटीकल, वैदयकीय उपकरणे यांचे मॅन्युफॅक्चरींग युनिट, सतत प्रक्रीया आवश्यक असलेले उत्पादन युनिट्स व पुरवठा साखळी, आय टी हार्डवेअर मॅन्युफॅक्चरींग युनिट, ज्युट उत्पादन करणारे यांना ठराविक शिफ्ट प्रमाणे सामाजिक अंतर पाळुन तसेच पॅकेजींग मटेरीयलचे मॅन्युफॅक्चरींग युनिट्सना परवानगी आहे.

क)ई-कॉमर्स सेवांमार्फत केवळ जीवनावश्यक मालाच्या विक्रीस परवानगी आहे.

ड)संरक्षण आणि सुरक्षा सेवा , मध्यवर्ती सशस्त्र पोलीस दल, आरोग्य व कुटुंब कल्याण, पोलीस, कारागृह, गृह रक्षण, नागरी संरक्षण, अग्नीशामक व आपत्कालीन सेवा, आपत्ती व्यवस्थापन आणि जलद कृतीदल संबंधी सेवा, राष्ट्रीय माहिती केंद्रे, भारतीय खादय महामंडळ तसेच राष्ट्रीय सिसमॉलॉजि सेंटर, एनसीसी, नेहरु युवा केंद्र आणि कस्टम्स व नगरपालिका व महानगरपालिका यांना कोणत्याही निर्बंधाविना परवानगी आहे. तसेच नागरी सेवा पुरविण्यासाठी साठी परवानगी असुन त्यासाठी आवश्यक स्टाफची नेमणुक करावी.

**इ) सरकारी कार्यालये मर्यादित पाच टक्के** मनुष्यबळासह चालु राहतील.

**ई)पावसाळा पुर्व इतर इमारतींना धोकादायक ठरु शकतील अशी अर्धवट बांधकामे,वॉटर प्रुफिंग, पुरपरिस्थितीस प्रतिबंधात्मक कामे, धोकादायक इमारतीचे निष्कासन** शकतील अशी, संरक्षक भिंत बांधकाम, जलरोधक कामे,पावसाळा पुर्व प्लास्टर प्लबिंग अशा स्वरुपाची कामे,**पावसाळा पुर्व मेट्रोची कामे महापालिकेचे पुर्वपरवानगीने करता येतील.** बाहेरुन कामगार आणण्याची आवश्यकता नाही असे चालु असलेले बांधकाम प्रकल्प **(परंतु सदर ठिकाणी काम करणा-या कामगारांना राहण्याची व भोजनाची व्यवस्था बांधकामाच्या ठिकाणीच (इनसीटु) करण्यात यावी.) कामगारांचे थर्मल स्कॅनिंग व वैदयकीय तपासणी करावी. बांधकामाच्या जागेवर गर्दी टाळावी. सामाजिक अंतराचे काटेकोरपणे पालन करावे.कामगारांनी चेह-यावर मास्क परिधान करणे बंधनकारक राहील.कामगांराना सॅनिटायझर हॅान्डवॉश उपलब्ध करुन दयावा. तसेच बांधकामाच्या जागेस बॅरिकेटींग करुन घेण्यात यावेत.**

**कामासाठी आवश्यक असलेली मालवाहतुक** महापालिकेच्या **पुर्व परवानगीने विशेष वाहनाने कामगारांमध्ये सामाजिक अंतर पाळुन करावी.**

उ) १) अक्षय उर्जा प्रकल्पांना परवानगी आहे. जिवनावश्यक मालाची निर्मिती करणारे, डाळ मिल,पिठगिरण्या, दुधप्रक्रिया उदयोग, ब्रेड फॅक्टरी असे अन्नप्रक्रिया उदयोग, औषधे व फार्मास्युटिकल निर्मिती करणारे, वैदयकीय उपकरणे निर्मिती करणारे, त्यासाठी लागणारा कच्चा माल व इतर २) उत्पादन प्रक्रिया चालणारे (राज्य सरकारच्या पुर्व परवागनीनुसार) ३) टेलीकम्युनिकेशन्स्, इंटरनेट सेवा, आय टी आणि फक्त आय टी संलग्न सेवा (अत्यावश्यक सेवेसाठी) आणि जास्तीत जास्त वर्क फ्रॅार्म होम ४) कोळसा आणि खनिज उत्पादने व त्याची वाहतुक ,स्फोटकाचा पुरवठा, खनिज उदयोगाशी आवश्यक बाबी ५) खादय पदार्थ, औषधे, फार्मास्युटिकल आणि वैदयकीय उपकरणांचा पॅकेजींग माल तयार करणा-या कंपन्या ६) तसेच बी -

बियाणे,खते, किटकनाशकांचा पॅकेजींग माल तयार करणा-या कंपन्या / आस्थापना ७) मासेमारी, मस्त्यपालन, व्यवसायीक मस्त्यालय, मस्त्यबिज,मस्त्य खादय आणि त्यासंबंधी कामे, उद्योग,खादय आणि देखभाल युनिटस, हॅचरी, फीडप्लॅन्ट ८) शेतकरी व शेतमजुर यांची शेतीतील कामे, कृषी मालाची खरेदी करणा-या संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती व इतर राज्यशासनाच्या निर्देशाने चालणा-या बाजार मंडई. ९) ऑनलाईन व दुरशिक्षण यांना परवानगी राहील. आयात निर्यातीची सुविधा जसे की पॅकेजिंग हाऊस, बियाने व फलोत्पादने यासाठीची निरीक्षण व तपासणी केंद्रे, कृषी व बागकाम विषयीचे संशोधन केंद्रे, वनविभागाअंतर्गत वनीकरण व रेशीम शेती विषयीची कामे.

ऊ)केंद्र सरकारकडील संरक्षण विभाग केंद्रीय निमलष्करी दले, ट्रेझरी (पे अॅन्ड अकाऊंन्ट कार्यालये ) आर्थिक सल्लागार व केंट्रोलर जनरल ऑफ अकाऊंन्ट यांची क्षेत्रीय कार्यालये तसेच राज्य सरकारकडील पोलीस, होमगार्ड, सिव्हील डिफेन्स, अग्निशमन सेवा व आपत्कालीन सेवा, कारागृहे, खाजगी सुरक्षा सेवा,जिल्हा प्रशासन आणि कोषागारे (कमीत कमी नाममात्र मनुष्यबळासह) नागरिकांच्या उपयुक्ततेच्या (पेट्रोलीयमपदार्थ, ऑईल,एलपीजी,सीएनजी,पीएनजी)पाणी पुरवठा व सॅनिटेशन सेवेशी महापालिका/नगरपालिका, ग्रामपंचायत कडील अत्यावश्यक सेवेशी निगडीत कमीत कमी स्टाफ, वन विभागाकडील झु नर्सरी, वाईल्ड लाईफ,गस्त इत्यादीकामांसाठी लागणारे अत्यावश्यक मनुष्यबळ समाजकल्याण विभागाकडील अनाथालये, बालकाश्रम,बालसुधारगृह, विकलांग व दिव्यांगगृहे ,जेष्ठ नागरिक, महिला, विधवा , पेंशनधारक इत्यादींशी संबंधित अत्यावश्यक स्टाफ, सामाजिक विभागामध्ये अंथरुणावरील रुग्णांची काळजी घेणा-या व घरी जावुन जेष्ठ नागरिकांची काळजी घेणारे व्यक्तींना,विदयुत निर्मिती व पुरवठा, पोस्ट ऑफिस, आपत्कालीन व्यवस्थापन आणि प्राथमिक सुचना देणा-या संस्था, राष्ट्रीय माहिती केंद्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाशी संबंधित संस्था (कमीत कमी नाममात्र मनुष्यबळासह), बँका, पोस्ट ऑफीस,एटीएम, इन्शुरन्स कंपन्या, सिक्युरिटी आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडीयाने अधिसुचित केलेल्या भांडवल आणि कर्जबाजार सेवा, रुग्णालये, आरोग्य सेवा, वैदयकीय महाविद्यालये, (अॅलोपॅथी आयुर्वेदीक,होमीओपॅथीक) पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, औषध विक्रीची दुकाने, जनेरिक औषधे, फार्मासुटीकल्स, टेलीकॉम सेवा व इंटरनेट सर्व्हिसेस,शासकीय सेवेसाठी कार्यरत असलेली डाटा आणि कॉल सेंटर, केबल सर्व्हिसेस, ब्रॉडकास्टींग सर्व्हिसेसशी संबंधित आस्थापना, ईलेक्ट्रीक फॅनची दुकाने.

ग) अंत्यविधी (कमाल २० व्यक्तीपुरता मर्यादित)

ज)अत्यावश्यक किराणा सामान, रेशन दुकाने, दुध/दुग्धोत्पादने, कृषी सेवा केंद्र, शेती यंत्राची दुकाने त्यातील सुटे भाग (पुरवठा साखळीसह) व दुरुस्ती दुकाने, पशुखादय, फळे व भाजीपाला, चारा, शीतगृहे आणि कोठारगृहे, जिवनावश्यक वस्तुचा साठा असलेले वेअर हाऊस, जीवनावश्यक वस्तु विक्रीची ठिकाणे, अत्यावश्यक सेवेतील खाजगी सुरक्षा आस्थापना, अत्यावश्यक व जिवनावश्यक वस्तुची वाहतुक करणारे मोटार ट्रक व त्या वाहतुकीशी संबधीत काम करणारे मनुष्यबळ (पुर्व परवानगीने व त्याबाबत आवश्यक ओळखीचे पुर्व परवानगींचे स्टीकर्स लावुन.)

फ) जेथे पर्यटक लॉकडाऊन मुळे अडकुन पडलेले आहेत असे हॉटेल्स्, पेंईग गेस्ट, लॉजेस आणि मोटेल्स्, तसेच वैदयकीय आणि आपत्कालीन सेवेकरिता नेमलेला स्टाफ, विलगीकरण कामकाजासाठी नेमण्यात आलेला स्टाफ.

प) प्रसार माध्यमाचे (सर्व प्रकारचे दैनिक, नियत कालिके, मासिके, टी.व्ही.न्युज चॅनल, इ.) कार्यालये चालु राहतील. प्रिंट मिडीयास सवलत देण्यात आलेली आहे परंतु कोविड १९ च्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने वृत्तपत्रे व नियतकालिकांच्या घरपोच डीलीवरीबाबत ग्राहकास ज्ञात असणे जरुरीचे आहे व घरपोच डिलीवरी देणा-या व्यक्तीने मास्क परिधान करणे हॅन्डसॅनिटायझरचा वापर करणे व सामाजिक अंतर पाळणे आवश्यक आहे.

ब) ई-कॉमर्स कंपन्या हे आवश्यक पुर्व परवानगीसह त्यांची वाहने ही फक्त अत्यावश्यक सेवेअंतर्गत (उदा. खादय, औषधे, वैदयकीय उपकरणे, विदयुत व विदयुत उपकरणे) यांना परवानगी राहील.

भ) तात्कालीन व प्रासंगीक विशेष बाबी लक्षात घेवुन परवानगी घेतलेबाबत महत्वाच्या आस्थापनांना व व्यक्ती समुह यांना लागु राहणार नाही.

१३) **वाहतुक मनाईबाबत सदर आदेश खालीलबाबतीत लागु होणार नाहीत.**

- पोलीस व आरोग्य विभाग तसेच आपत्ती निवारण व्यवस्थापनाशी संबंधित (फक्त कर्तव्यार्थ)

- तातडीची रुग्णवाहतुक व हॉस्पीटलमधील डॉक्टर व पॅरामेडिकल स्टाफ,आरोग्यसेवा (फक्त कर्तव्यार्थ)इंडीयन रेड क्रॉस सोसायटी आरोग्य सेवा
- तात्काळ वैदयकीय उपचार आवश्यक असलेल्या रुग्णांना व प्रवाशांना
- अत्यावश्यक सेवा(उदा. वीज, पाटबंधारे/पाणी पुरवठा, दुरसंचार,अग्निशमन,बँक व एटीएम, विमा,इन्शुरन्स,फिनटेक सर्व्हिसेस आणि संबंधित सेवा, प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया, टेलीकम्युनिकेशन्स्,इंटरनेट,सेवा, आय टी आणि फक्त आय टी संलग्न सेवा ( अत्यावश्यक सेवेसाठी )वृत्तपत्र व वृत्तपत्र वितरण साखळी, पोस्टल इंटरनेट आणि डाटा सर्व्हिसेस संबंधित उद्योग - Critical National Infrastructure (फक्त कर्तव्यार्थ व तातडीचे असल्यास)
- जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा पुरविणारे तसेच जिवनावश्यक व अत्यावश्यक वस्तुंची वाहतुक करणारी वाहने (वाहन चालक आधिक एक व्यक्ती)
- जिवनावश्यक मालाचे उत्पादन होणा-या ठिकाणावरुन ते घाउक व किरकोळ विक्रेत्यांपर्यंत वाहतुक करणारे वाहन/चालक/हमाल यांना शहराअंतर्गत/ जिल्हयाअंतर्गत/राज्य व केंद्रशासीत प्रदेशाअंतर्गत, तसेच जीवनावश्यक माल व अत्त्यावश्यक मालवाहतुक करणारी वाहने आणि यार्व्यतिरिक्त मालवाहतुक व रिकाम्या माल वाहतुक करणा-या वाहनांना तसेच राज्याअंतर्गत शेतमाल व शेती मालाशी संबंधित उत्पादने जनावरांचा चारा/बि बीयाणे/कीटकनाशके यांची आयात व निर्यात
- आंतरराज्य मालाची / कारगोची निर्यातीसाठीची वाहतुक, राज्यांतर्गत आणि आंतरराज्य शेती माल, शेती संबंधित यंत्रसामुग्री,कापणी यंत्र,पेरणीयंत्र,आणि शेती व शेती फळबागा संबंधित साधने यांची वाहतुक.
- मधुमक्षिपा पालन, मधमाश्यांची पोळी व इतर मधमाशी उत्पादने इत्यादींच्या उदयोगासाठी लागणा-या साहित्यांची राज्यांतर्गत व आंतरराज्य वाहतुक
- ई-कॉर्मर्स वाहतुकी अंतर्गत अत्यावश्यक माल त्यामध्ये फार्मास्युटिकल्स् आणि वैदयकीय उपकरणे
- खादय पदार्थ विक्री किराणा माल, दुध व दुग्धजन्य पदार्थ, ब्रेड, फळे, भाजीपाला, अंडी, मटण, मासे यांची वाहतुक आणि कोठारगृहे/ गोदामे यांचेपर्यंत व पासुनची वाहतुक
- बेकरी आणि पाळीव प्राण्यांसाठीच्या पशु वैदयकीय आस्थापना पॅकेजिंग
- रेस्टॉरंटमध्ये बनविलेले खादयपदार्थ घरपोच पार्सल/ डिलीव्हरी/टेक अवे सेवा मध्ये डिलीव्हरी देणा-या व्यक्तीने चेह-यावर मास्क परीधान करणे अनिवार्य आहे तसेच वारंवार सॅनिटायझरचा वापर करणे आणि सामाजिक अंतर पाळणे आवश्यक आहे. तसेच रेस्टॉरंट चालकाने डिलीव्हरी देणा-या व्यक्तीची व किचन स्टाफची नियमीत आरोग्य तपासणी करावी.
- दवाखाने, औषधालये, चष्मा दुकाने, फार्मास्युटिकल्स् मॅन्युफॅक्चरिंग, स्वच्छतेशी निगडीत उदा. हँडवॉश, साबण,शांपु, जंतुनाशक, बॉडीवॉश, सरफेस क्लिनर, डीटरजंट, टीश्युपेपर, टुथपेस्ट, सॅनीटरी पॅड, डायपर यांसारखी उत्पादने आणि त्याचे वितरक यांना वाहतुकीसाठी
- पेट्रोल पंप, एल पी जी गॅस, ऑईल एजन्सीस्, बॅटरी सेल चार्जर्स आणि त्यांची गोदामे आणि तत्सम वाहतुक,महामार्गावरील पेट्रोलपंपवरील व नजीकची ट्रक दुरुस्तीची दुकाने,
- अत्यावश्यक सेवेस सुरक्षा आणि सेवा सुविधा पुरविणा-या संस्था
- कोव्हिड - १९ ला प्रतिबंध करण्यासाठी अत्यावश्यक सेवांचा पुरवठा करणा-या खाजगी आस्थापना
- प्रसारमाध्यमे व त्यांचे प्रतिनिधी (फक्त कर्तव्यार्थ)
- सामाजिक हेतुने वृद्धाश्रम/निराधार/अपंग/जेष्ठ नागरीक/एकाकी व्यक्ती यांना संस्थेच्या माध्यमातुन पुरविल्या जाणा-या अत्यावश्यक वैदयकीय सेवा व भोजन सेवा सामाजिक विभागामध्ये अंथरुणावरील रुग्णांची काळजी घेणा-या व घरी जावुन जेष्ठ नागरिकांची काळजी घेणारे व्यक्तींना
- वर नमुद उल्लेख केलेल्या अत्यावश्यक सेवांची पुरवठा करणारी साखळी
- परवानाप्राप्त चारचाकी वाहनात एक चालक अधिक दोन प्रवासी यांना अत्यावश्यक सेवेसाठी वाहतुक व प्रवासी वाहतुक करता येईल.
- अत्यावश्यक सेवांकरिता यापूर्वी पोलीसांमार्फत देण्यात आलेले पास दि.१७ मे पर्यंत लागू राहतील.

- शासकीय कार्यालयांना त्यांचे हद्दीकरीता कर्मचा-यासाठी आवश्यक पास मनपा मार्फत उपलब्ध करुन दिले जातील. याकरिता संबंधित आस्थापनेचे विभागप्रमुख शासनाच्या निर्देशाप्रमाणे आवश्यक कर्मचा-यांची सुची प्रमाणित करुन मनपा कार्यालयास सादर करतील.
- मोशी कृषी उत्पन्न बाजार समितीबाबत मा. विभागीय आयुक्त पुणे यांनी पारित केलेल आदेश कायम लागु राहतील. बाजार समितीतील व्यवहारांना सदरच्या आदेशामधुन वगळण्यात येत आहे.
- तसेच उर्वरित क्षेत्रात दुधाची किरकोळ विक्री सकाळी ०६/०० ते सायं ०६/०० या कालावधीतच सुरु राहील. शहराच्या उर्वरित भागात भाजीपाला व फळे विक्री ही सकाळी १०/०० ते दुपारी ०४/०० या वेळेत मनपामार्फत दिलेला आदेश क्र भुजि/०२/कावि/२१०/२०२० दि.१५/०४/२०२० व भुजि/०२/कावि/२२५/२०२० दि.७/०४/२०२० नुसार निश्चित केलेल्या जागांवरच सुरु राहील. त्याव्यतीरिक्त उर्वरित कालावधीमध्ये विक्रीस प्रतिबंध राहील. घरपोच भाजीपाला व फळे विक्री ही मनपाच्या पुर्व मान्यतेनुसारच अनुज्ञेय करण्यात येईल.शहराच्या उर्वरित भागात सदर विक्री ही यापुर्वी मनपाने दिलेल्या आदेश क्रमांक भूजि/०२/कावि/२२०/२०२० दि.१६/०४/२०२० नुसार सकाळी १०/०० ते दुपारी ०४/०० या वेळेत सुरु राहील.
- कन्टेन्मेन्ट झोन बाहेरील उर्वरित क्षेत्रात अत्यावश्यक इतर सामान जसे अन्न धान्य जिवनावश्यक वस्तु यांची किरकोळ विक्री सकाळी १०/०० ते दुपारी ०४/०० या वेळेतच सुरु राहील:
- कंन्टेन्मेन्ट झोन बाहेरील भाजीपाला विक्री मंडई तसेच मटन व चिकन यांची किरकोळ विक्री तसेच अन्नधान्य जीवनावश्यक वस्तु याची किरकोळ विक्रीची ठिकाणे पिंपरी चिंचवड महापालिकेकडून निश्चित केलेल्या जागांवर व परवाना प्राप्त ठिकाणावर आणि परवानगी दिलेल्या कालावधीप्रमाणे सुरु राहतील.त्याव्यतीरिक्त उर्वरित ठिकाणी विक्रीस प्रतिबंध राहील.(सामाजिक अंतर पाळणे,मास्क परिधान करणे बंधनकारक राहील.)

## १४) कोविड १९ अनुषंगाने राष्ट्रीय निर्देश

### अ) सार्वजनिक ठिकाणे-

१.सर्व सार्वजनिक ठिकाणी नागरीकांनी तोंडावर मास्क परिधान करणे बंधनकारक आहे.

२.सर्व सार्वजनिक ठिकाणांचे व वाहतुकीचे प्रभारी यांनी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार सामाजिक अंतर पाळले जात असल्याबाबत खात्री करावी.

३.कोणतीही संस्था अथवा सार्वजनिक स्थळांचे व्यवस्थापक यांनी ५ किंवा ५ पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्याची परवानगी देवु नये.

४.लग्न सोहळयासारख्या कार्यक्रमांना ५० पेक्षा जास्त लोकांना परवानगी दिली जाणार नाही.

५.अंतिमसंस्कार/ अंत्यविधी सारख्या कार्यास २० पेक्षा जास्त लोकांना परवानगी दिली जाणार नाही.

६.सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-या व्यक्तिंवर दंडात्मक कारवाई करावी.

७.सार्वजनिक ठिकाणी मदय, पान, गुटखा, तंबाखु खाण्यास सक्त मनाई आहे.

८.मदय, पान, गुठका, तंबाखु यांची विक्री कराणा-या दुकानाचे ठिकाणी किमान सहा फुट अंतर सामाजिक अंतर पाळणे गरजेचे असुन एका वेळी ५ पेक्षा जास्त लोक असु नयेत.

### ब) कार्यालयाची ठिकाणे-

१.कामाच्या ठिकाणी मास्क परिधान करणे बंधनकारक असुन सदर ठिकाणी मास्कची पुरेशी उपलब्धता केलेली असावी.

२. सर्व कामाच्या ठिकाणांचे प्रभारी यांनी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार कामाच्या ठिकाणी तसेच कंपनीचे वाहतुकीबाबत सामाजिक अंतर पाळले जात असल्याबाबत खात्री करावी.

३. कामाचे ठिकाणी सामाजिक अंतर पाळताना कामगारांचे शिफ्ट्स मध्ये योग्य अंतर असणे व स्टाफचे जेवणाच्या सुट्टीच्या वेळा नियोजित करणे याकडे लक्ष पुरवावे.

४. कामाच्या ठिकाणी प्रवेश द्वारावर येण्याच्या व जाण्याच्या वेळी थर्मल स्कॅनिंग, हॅन्डवॉश व सॅनिटायझर साठी टचफ्री मशिन्सचा वापर करावा तसेच कामाच्या ठिकाणी हॅन्डवॉश व सॅनिटायझरची पुरेशी उपलब्धता केलेली असावी.

५. कामाच्या ठिकाणाचे तसेच तेथील सामान्य सुविधांचे व लोकांच्या सतत संपर्कात येणा-या बाबींचे संपुर्ण सॅनिटायझेशन करावे. उदा. दरवाजाचे हॅन्डल्स

६. ६५ वर्षे वयोगटातील वृद्ध, विकलांग, गरोदर महिला, व १० वर्षे वयाखालील मुले यांनी जिवनावश्यक व वैदयकीय गरजे व्यतिरीक्त घराबाहेर पडु नये.

७. सरकारी व खाजगी क्षेत्रातील सर्व कर्मचारी व अधिका-यांना आरोग्य सेतु ॲप वापरणे बंधनकारक आहे. कार्यालयातील १०० टक्के लोक आरोग्य सेतु ॲप वापरतील याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची असेल.

८. मोठया बैठकांचे आयोजन करु नये.

९. कोविड १९ संदर्भात औषधोपचार उपलब्ध असलेल्या रुग्णालयांची यादी कामाचे ठिकाणी उपलब्ध करावी व कोणत्याही कामगारास कोविड १९ ची लक्षणे आढळुन आल्यास तात्काळ संबंधीत रुग्णालयात औषधोपचासाठी उपचारकामी पाठवावे.

टीप :- १)वरील नमुद सर्व सवलत दिलेले संबंधित अधिकारी कर्मचारी खाजगी व्यक्ती यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश ओळखपत्र याबाबतचा पुरावा सोबत बाळगणे बंधनकारक आहे.

२)वर नमुद ठिकाणी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडुन देण्यात आलेल्या आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच सामाजिक अंतर ठेवण्याबाबतच्या उपाययोजनांची दक्षता संबधीत कार्यालये, दुकान, आस्थापना यांचे चालक मालक, कार्यालय प्रमुख व्यवस्थापक यांनी घ्यावी.

३)पेट्रोल पंप चालकांनी वर नमुद अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचे ओळखपत्र व कार्यालय याबाबतचा पुरावा तसेच वाहनांच्या कागदपत्रांचा पुरावा तपासुन त्यांच्या वाहनांना आवश्यकता असेल त्यावेळी इंधन पुरवठा करावा.

४)रुग्ण वाहतुकीवेळी संबंधित रुग्णांनी दवाखान्यातील उपचाराबाबतची कागदपत्रे सोबत बाळगावीत.

५) कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी नेमणुक केलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्याबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

६) वरील सर्व नमुद अपवादात्मक व्यक्ती व आस्थापना यांना कर्तव्याखेरीज ही सवलत लागु होणार नाही.

१५)नमुद सवलतींच्या निकषांची पुर्तता करतेवेळी सर्व संबंधितांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळणेकरिता आरोग्य विभागाकडुन सुचित केलेल्या खबरदारीच्या उपायांचे **(उदा - मास्क, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे)** काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

१६)सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१७) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नाटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक ३.०५.२०२० रोजी दिलेला आहे.

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :- ३.०५.२०२०